MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



- साहेब! दारू, गुटखा, मटका, जुगार असे अनेक अवैध धंदे सुरू असलेले बंद करून गोरगरीब **महिलांचे संसार वाचवा!**
- पोलीस कर्मचारी राबवतात **हप्ता वसुलीची मोहीम**;
- पोलीस अधीक्षकांनी यात लक्ष घालण्याची मागणी
- कर्मचाऱ्यांपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत प्रत्येकाचे वेगळे हप्ते असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे
- गेवराई तालुक्यात अवैध धंदे करणाऱ्यांना पोलीस प्रशासनाच्या **खाकी वर्दीचा धाकच राहिला नाही?**
- तालुक्यातील अवैध धंद्यांचे **छुपे अड्डे पोलीसांनी शोधून कारवाई करावी!**

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२३६ | रविवार दि.१९ मे २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -236 | SUNDAY DT. 19 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# गेवराई तालुक्यात अवैधरीत्या दारू विक्रीसह अनेक अवैध धंदे जोमात अन पोलीस प्रशासन कोमात













**पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर साहेबांचे विशेष पथक पुन्हा चालू करण्याची जनतेकडून मागणी**

**गेवराई पोलीस ठाणे, तलवाडा पोलीस ठाणे, चकलांबा पोलीस ठाणे या तीनही पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांचा सुळसुळाट!**

**पोलीस प्रशासनाच्या सहयोगाने दारू विक्री करणाऱ्या व्यवसायीकांना प्रोत्साहन**

**दारुमुळे नवविवाहितांसह अनेकांचे संसार उघड्यावर परवाने नसताना अनेक हॉटेल व्यावसायिक मद्यविक्री करत आहेत.**

गेवराई स्पेशल रिपोर्ट : महाराष्ट्र आरंभ

गेवराई शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सध्या मोठ्या प्रमाणात अवैध धंद्यांचे स्तोम माजले आहे. आणि पोलीस प्रशासनातील कर्मचारी कारवाई करण्याऐवजी हप्ता वसूल करण्यात मग्न असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. स्वच्छ प्रतिमा असलेले पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी याप्रकरणी लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील अनेक गावांत अवैध गावठी दारू, देशी विदेशी दारू, मटका, जुगार, गांजा, गुटखा यांची विक्री राजरोसपणे सुरू आहे. सामान्य नागरिकांना या अवैध धंद्यांचा त्रास होत आहे, मात्र संबंधित व्यावसायिक आणि पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचे संगणमत असल्याने याबाबत तक्रार करायची कोठे? असा संतप्त सवाल नागरिकांमध्ये उपस्थित होत आहेत. तसेच अवैध व्यावसायिकांची दहशत असल्याने नागरिक तक्रार करण्यास पुढे येत नाहीत.

गेवराई तालुक्यात अवैध दारू विक्री जोमात चालली असून, यामुळे युवा पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या विळख्यात अडकली जात आहेत. वाईन शॉपमधून ही दारू खरेदी केली जाते. आणि ती चढत्या दराने ग्रामीण भागात विक्री केली जात आहे. याचा दुष्परिणाम सुशिक्षित लोकांना, शाळकरी विद्यार्थी आणि महिलांना सोसावा लागत आहे. गावातच तसेच गावाजवळच हॉटेल टाकून अवैधरीत्या दारू विक्री करत असल्याने आठवड्यातून एकदा पिणारे बहाद्दरही दररोज दारू पिऊन घरात भयंकर महिलांना त्रास देतात. ही दारू बंद करून आमचे संसार वाचवा अशी मागणी महिला करीत आहेत.

गेवराई पोलीस ठाणे, तलवाडा पोलीस ठाणे तसेच चकलांबा पोलीस ठाणे या तीनही पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू उपसा, अवैधरीत्या देशी विदेशी दारू विक्री, मटका, जुगार, गांजा, हातभट्टी दारू, गुटखा यासह अनेक अवैध धंदे जोमात सुरू आहेत. वाढत्या अवैध धंद्यांमुळे गेवराई तालुक्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे सगळे खुलेआम सुरू असताना हे पोलीस प्रशासन करतंय तरी काय? तसेच या अवैध धंद्यांवर पोलीस कारवाई करण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत. असा संतप्त सवाल सर्व सामान्य नागरिकांमधून केला जात आहे.

*दिवसाढवळ्या चोऱ्या असतील किंवा दादागिरी असेल सध्याच्या लोकसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने जातीय तीळ निर्माण होण्याच्या जास्त घटना घडलेल्या आहेत यालाच हेच दोन नंबर वाले जास्त जबाबदार असून यांना मात्र बीड जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक यांचे विशेष पथक फक्त बंद करू शकते तर बीड जिल्ह्यामधील अनेक या अगोदर अवैध धंद्यावरती कारवाई पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांच्या पथकाने केलेले आहेत परंतु हे पथक काही दिवसापूर्वी बंद करून लोकसभा निवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ वापरण्यासाठी बंद केले होते.परंतु आता हेच एस पी साहेबांचे विशेष पथक चालू करण्याची गरज आहे कारण यामध्ये दारू गुटखा वाळू माफिया सह अनेक अवैद्य धंद्यावरती या पथकाची नजर असून या पथकाने यावेळी जर कारवाया केल्या तर यामध्ये अनेक गुन्हेगार अडचणीत येतील आणि या गुन्हेगारांना कुठेतरी थांबविण्याचा प्रयत्न यावेळी नक्कीच या पोलीस अधीक्षक यांच्या पथकाकडून करण्यात येईल कारण बीड जिल्ह्यामध्ये अवैद्य दारू असेल गुटखा असेल मटका वाळू सह अनेक माफी सध्या बोकाळलेला आहे म्हणून पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकूर यांनी हे पथक चालू करणे गरजेचे आहे*

# कर्मचारी आले आणि दहा मिनिटातच भुर.. झाले

## गटविकास अधिकाऱ्यांनाही कळेना कर्मचारी कुठे गेले. पत्रकारांसमोरच घडला प्रकार

निष्क्रिय गटविकास अधिकारी पुन्हा तालुक्याला मिळाले

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

धारुर पंचायत समितीचा कारभार सध्या राम भरोसे सुरू आहे येथील कर्मचारी येतात आणि दहा मिनिटातच जातात किंवा बाजूच्या हॉटेलमध्ये जाऊन बसतात याची प्रचिती पुन्हा आली. कर्मचारी आले आणि दहा मिनिटातच भूर... झाले असा प्रकार तालुक्यातील पत्रकार समोरच दिसून आला.




गटविकास अधिकाऱ्यांचे कोणतेही कर्मचारी ऐकत नसल्याचे दिसून येत आहे त्यामुळे आता जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांनी त्या पंचायत समितीकडे लक्ष द्यायला हवे. गोपाळपूर अंतर्गत येणाऱ्या संभाजीनगर , वडारवाडी भागामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणीटंचाई आहे. या भागात टँकरच्या खेपा वाढवाव्यात तसेच ज्या ठिकाणी गर्दी आहे तिथे पुढील पॉईंट द्यावा या मागणीसाठी पत्रकार नाथा ढगे, विशाल सराफ पंचायत समितीमध्ये गेले होते पंचायत समितीत गेले असता गटविकास अधिकाऱ्यांनी संबंधित पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्याला बोलावले परंतु कर्मचारी काही खुर्चीवरती नव्हते त्यांना फोन लावला असता फोनही त्यांनी रिसीव केला नाही कर्मचारी तर आले होते परंतु गेले कुठे हे गटविकास अधिकाऱ्यांनाही माहीत नव्हते यामुळे आता पंचायत समितीत येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पितळ उघडे झाले आहे. यायचे आणि दहा मिनिटातच भूर ... व्हायचे असा प्रकार सरास धारूर पंचायत समितीमध्ये दिसून येत आहे यामुळे सर्वसामान्यांचे कामे खोळंबत असून अशा बेशिस्त कर्मचाऱ्यांवर कारवाईची मागणी होत आहे . काही काही कर्मचारी तर आल्याबरोबर सही करतात आणि पुन्हा दिवसभर कार्यालयात येतच नाही अशाही तक्रारी आता प्राप्त होत आहेत . गटविकास अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांवर वचक ठेवायला हवा

निष्क्रिय गटविकास अधिकारी - धारूर तालुक्याला पुन्हा एकदा निष्क्रिय गटविकास अधिकारी मिळाल्याचे बोलले जात आहे धारूर तालुका हा गरीब ऊसतोड मजुरांचा तालुका समजला जातो या भागातील ग्रामीण जनतेच्या मोठ्या समस्या आहेत परंतु या सोडवण्यामध्ये गटविकास अधिकारी अपयशी ठरत आहे त्यामुळे पुन्हा एकदा जनता बोलत आहे की निष्क्रिय गटविकास अधिकारी तालुक्याला मिळाले आहे.

# प्रदीप कुलकर्णी यांनी साहित्यात उच्चांक गाठला- स्नेहल पाठक



माजलगाव (प्रतिनिधी) :- माजलगावात साहित्य चळवळ आहे, साहित्यिक ही भरपुर आहेत. अनेकांचे लिखाण खुप सुंदर आहे. हे सगळे असले तरी प्रदीप कुलकर्णी यांनी 'प्रेमात पडायचे होते पण' ही कादंबरी प्रकाशीत करुन माजलगाव च्या साहित्य चळवळीत उच्चांक गाठला आहे. यामुळे त्यांचे खरच कौतुक करावे तेवढे कमीच आहे अशा शब्दात प्रदीप कुलकर्णी यांच्या बद्दलच्या भावना प्रेमात पडायचे होते पण या कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना प्रा.स्नेहल ताई पाठक यांनी व्यक्त केल्या.

श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या सभागृहात प्रदीप कुलकर्णी लिखीत प्रेमात पडायचे होते पण या कादंबरीचा प्रकाशन सोहळा अत्यंत आनंदात आणि उत्साही वातावरणात दि. १८ मे २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे अध्यक्ष आर.जी.कानडे हे होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती देवीचे पुजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा सत्कार भगवंत हावरगावकर, सौ. भाग्यश्री हावरगावकर, सौ. आनंदी कुलकर्णी, रविंद्र सोनवळकर यांच्या हस्ते करण्यात आला. लेखक प्रदीप कुलकर्णी यांचा मंगलनाथ परिवाराच्या वतीने भव्य दिव्य असा सत्कार करुन त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या वेळी ॲड. रविंद्र कानडे, ॲड. सुनिल सौंदरमल, पत्रकार बालासाहेब फपाळ, कवि प्रकाश पत्की, भिमराव होके यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र सोनवलकर यांनी केले. कार्यक्रमाचे शेवटी शाश्वती अर्बन चे चेअरमन नंदकुमार हावरगावकर यांनी आभार मानले.कार्यक्रमास माजलगाव शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यात वकील साहित्यिक, पत्रकार, वाचक यांच्यासह श्री मंगलनाथ मल्टीस्टेट च्या कर्मचाऱ्यांचा समावेश होता.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# तलवारीने केक कापणे अंगलट; सहा जणांवर गुन्हा दाखल

दिंद्रुड (प्रतिनिधी)

वाढदिवसाच्या दिवशी तलवारीने केक कापणे एका तरुणाच्या आणि त्याच्या मित्रांच्या अंगलट आले. शस्त्र दाखवून दशहत पसरवल्याप्रकरणी दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. माजलगाव तालुक्यातील मोगरा येथे ही घटना घडली. अतुल किशन पांढरपोटे या माजलगाव तालुक्यातील मोगरा येथील तरुणाचा दोन दिवसांपूर्वी वाढदिवस होता. वाढदिवसाच्या निमित्ताने त्याने मित्रांसह केक कापून वाढदिवस साजरा केला. मात्र, केक कापण्यासाठी त्याने तलवारीचा वापर केला. याबाबतचा फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावरही टाकला. यानंतर दिंद्रुड पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी श्रीडोळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अतुल किशन पांढरपोटे, महादेव पांढरपोटे, अभिषेक पांढरपोटे, नागेश पांढरपोटे, भैय्या पांढरपोटे आणि ज्ञानेश्वर पांढरपोटे (सर्व रा. मोगरा, ता. माजलगाव) यांच्याविरोधात दिंद्रुड पोलिस ठाण्यात गुन्हा नंबर ९४/२०२४ कलम ४/२५ आर्मी क्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीने गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त केले असून आरोपीस अटक करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.




वाढदिवस साजरा करताना फटाके फोडणे तलवारीचा वापर करणे असे प्रकार समोर आल्यास त्यांच्यावर कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात येतील.

-सपोनि अण्णाराव खोडेवाड
पोलीस स्टेशन दिंद्रुड

# निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी चिंताग्रस्त

गेवराई (प्रतिनिधी)

गेल्या पाच सहा वर्षापासून सतत वातावरणात होणाऱ्या बदलामुळे व निसर्ग साथ देत नसल्यामुळे हाती आलेले पीक वाया जाण्याच्या प्रकार वाढत असताना पाऊस वेळेवर पडत नसल्याने खरीप आणि रब्बीची पिके पाहिजे ते प्रमाण शेतकऱ्यांना उत्पन्न देऊ शकत नसल्याने व फळबागाय साथ देत नसल्यामुळे पिकवलेल्या फळ बघायला पाहिजे प्रमाणात मार्केटमध्ये भाव मिळत नसल्यामुळे पिकासाठी शेतकऱ्यांनी बँकेकडून घेतलेले कर्ज केलेला खर्च निघत नसल्यामुळे वेळेवर फेडू शकत नाही.

त्यामुळे शेतकऱ्यावर अस्मानी संकट कोसळले असून शेतकरी मात्र पिकवलेल्या मालाला शासनाकडून भाव मिळत नाही तर केलेल्या खर्चात प्रमाणे उत्पन्न निघत नसल्यामुळे शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर निर्माण झाल्यामुळे शेतकरी आत्महत्याचा मार्ग पत्करत आसतांना शासन केवळ

आहे. अलीकडील पाच दहा वर्षाचा विचार केला तर परिसरातील शेतकऱ्यांची शेती अस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांना शेती करणे नुकसानीचे ठरत असून निसर्गाच्या लहरीपणामुळे उत्पादन हाती येत नसल्याम ळे डोक्यावरील कर्जाचा डोंगर दरवर्षी वाढतच आहे. उत्पन्न कमी आणि खर्च जास्त कारण आभाळाला भिडलेले बियाणे व खताचे दर आणि आवाक्याबाहेर गेलेली मजुरीच्या दरामुळे शेतकऱ्यांचा कल शेती बटाईने देण्याकडे दरवर्षी वाढताना दिसून येत आहे. जगाचा पोशिंदा समजला जाणाऱ्या देशातील शेतकरी आजच्या घडीला मात्र देशोधडीला लागला आहे.

कारण वातावरणातील बदलाचा शेतीला खूप मोठा फटका बसत असून ऐन पीक उगवण्याच्या काळात आणि काढणीच्या काळात आलेल्या अवकाळी पावसामुळे पिकांना व शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटाचा सातत्याने फटका सहन करावा लागत आहे. परिणामी पिकावरील लागलेला शेतकऱ्यांसाठी पोकळ आश्वासन देण्यापलीकडे काहीच करत नसल्याचे शेतकऱ्यात बोलले जात लागवडचा खर्च निघणे कठीण झाल्याने दरवर्षीच शेतीचा व्यवसाय आतबट्ट्याचा झाला आहे. मागील कित्येक वर्षापासून ऋतुचक्रात बदल दिसून येत असून पावसाळ्यात वेळेवर पाहिजे तेव्हा पाऊस पडत नाही. तरी शेतकऱ्यांची धडपड, काहीतरी तजवीज करून नाना प्रकारे पिकाची जोपासना करून सुद्धा ऐन पीक काढणीच्या वेळी अवकाळी पाऊस होऊन दरवर्षी कित्येक शेतकऱ्यांचे पीक पाण्यासोबत वाहून जात असल्यामुळे खूप मोठ्या माणात शेतकऱ्याची नुकसान होते. दरवर्षीच अवकाळी पाऊस तर कधी गारपिटीने जमीन दोस्त होत असल्यामुळे बळीराजा पुरता खचत चालला आहे.

तर काही ठिकाणी उन्हामुळे कोवळी पिके करपून जात असल्याने पिकाची फुलोऱ्यात



आणि शेंगा उगवण क्रिया बरोबर होत नाही. अशातच बियाणी आणि खतावर केलेला खर्चही निघत नाही. मजुरांचे देणेसुद्धा परवडत नाही निसर्गचक्र बिघडल्याने दिवसेंदिवस पुनर्मापन कमी होत चालले आहे.

# कार,मोटारसायकल व बैलगाडीच्या तिहेरी अपघातात एक ठार चार जखमी

## खामगाव-पंढरपुर महामार्गावर निज़ुड येथील घटना

माजलगांव (प्रतिनिधी)

तेलगावकडुन माजलगावकडे भरधाव वेगात जाणाऱ्या कारने एका मोटारसायकलसह बैलगाडीस जोराची धडक दिल्याने झालेल्या तिहेरी अपघातात एक जण ठार तर एका लहान बालकासह चार जण जखमी झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी खामगाव-पंढरपुर महामार्गावर निज़ुड येथे घडली.

यासंदर्भात माहिती अशी की,खामगाव-पंढरपुर महामार्गावर शनिवारी सायंकाळी सहा वाजे दरम्यान तेलगावकडुन माजलगावकडे जाणाऱ्या कार क्र.एम एच.२५ ए एस ८७६६ ने एका मोटारसायकलला पाठीमागून जोराची धडक दिली.ही धडक बसताच शेतातुन घराकडे जाणाऱ्या बैलगाडीस ही कारने जोराची धडक दिली.या धडकेत मोटारसायकलवरील रतन कांबळे(४५) रा.ह.मु.काळे वस्ती उमरी ता.माजलगाव यांना डोक्यास जोरात मार लागल्याने ते ठार झाले.तर मोटारसायकलवरील मनिषा सुरेश वाघमारे(४०),लक्ष्मी लखन कदम (३०)व कार्तिक लखन कदम (३) हे गंभीर जखमी झाले.तर निज़ुड येथील शेतकरी बाळासाहेब मोहन घुले सायंकाळच्या वेळी शेतातुन घराकडे जात असतानाच त्या कारची बैलगाडीस जोराची धडक बसल्याने घुले यांच्यासह दोन्ही बैलांना मार लागून ते गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान अपघात घडल्याचे समजताच निज़ुड येथील सामाजिक कार्यकर्ते शेख अतिक नामदेव बोरचाटे व इतरांनी घटनास्थळी दाखल होत तात्काळ १०८ रूग्णवाहिकेस कॉल केला असता रूग्णवाहिकेचे चालक शाम चव्हाण यांनी तेलगावहुन केवळ चार मिनीटात घटनास्थळी रूग्णवाहिका दाखल केली. रूग्णवाहिकेचे डॉक्टर एम.बीड.गायकवाड यांनी जखमींना माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात उपचारार्थ नेले.तेथे डॉ.सुभाष बडे यांनी जखमींवर उपचार करून पुढील उपचारार्थ बीडला पाठवले.

### घटनास्थळी ग्रामस्थ आक्रमक

कार चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याचे नित्रुड येथील ग्रामस्थांनी म्हटले असुन, त्या कार चालकाविरुद्ध पोलीसांनी कडक कारवाई करावी. यासाठी नित्रुड ग्रामस्थ आक्रमक झाले होते.यावेळी दिंद्रुड पोलीसांनी त्यांना शांततेचे आवाहन करत कार चालकाविरुद्ध कारवाई करण्यात येईल. असे सांगितले.

# लोकसभा निवडणूक! सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकणाऱ्यांवर बीड पोलिसांकडून ४२ जणांवर कारवाई

**गेवराई । प्रतिनिधी**

**सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न काही लोकांकडून केला जात आहे. अशाच लोकांचा शोध घेऊन बीड पोलिसांकडून कारवाया केल्या जात आहेत. शनिवारपर्यंत ४२ लोकांवर कारवाई करण्यात आली. त्यांना पोस्ट काढून टाकायला लावत पोलिसांनी नोटीसही बजावली. तसेच यानंतर वादग्रस्त पोस्ट केल्यास थेट गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.**

जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीचा प्रचार आणि मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. परंतू त्यानंतर सोशल मीडियावरून वातावरण तापू लागले आहे. काही लोक आक्षेपार्ह पोस्ट टाकत असल्याने वाद होऊ लागले आहेत. चार दिवसांपूर्वीच केज तालुक्यातील नांदुरघाट येथे एका पोस्टमुळे दोन गटात दगडफेक झाली. यात अनेकजण जखमी झाले. २०० पेक्षा अधिक लोकांवर गुन्हाही दाखल



झाला. त्यानंतर इतर ठिकाणीही निवडणूक कारणावरून वाद झाले आहेत. हे वाढते वाद पाहता पोलिसांनी शांततेचे आवाहन केले आहे. तसेच सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकू नये, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, राजकीय नेते, दोन समाजात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य करू नये, असे सांगितले आहे. असे असतानाही काही लोकांनी वादग्रस्त पोस्ट केल्या होत्या. त्यांचा शोध घेऊन पोलिसांनी त्यांना सीआरपीसी १०७, १०९, १०८, १४९ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाया केल्या आहेत. तसेच त्यांना पोलिस ठाण्यात बोलावून घेत समज देण्यात आली. याच अनुषंगाने पाच दिवसांपूर्वी युसूफ वडगाव पोलिस ठाण्यात गुन्हाही दाखल झालेला आहे.

# दक्षिण कोरिया दौरा आणि वाढदिवसाच्या निमित्ताने शाक्यमुनी प्रतिष्ठानच्या वतीने प्रा.प्रदिप रोडे, दिपाताई रोडे यांचे अभिष्टचिंतन

बीड (प्रतिनिधी)

दक्षिण कोरियाची राजधानी सेउल येथील बुद्ध विहारात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पहिला पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळा अनावरणास भारतीय प्रतिनिधीमंडळात प्रा.प्रदिप रोडे आणि तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा दिपाताई रोडे उपस्थित राहिल्याबद्दल अभिष्टचिंतन करण्यासाठी शाक्यमुनी प्रतिष्ठानच्या वतीने शनिवार दि. १८ मे रोजी सकाळी ११ वाजता तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे त्यांच्या सत्कार समारंभ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी शाक्यमुनी प्रतिष्ठानच्या वतीने प्रा.शरद वंजारे,प्रा.दिपक जमधाडे, प्रा.डॉ.संजय कांबळे, प्रा.श्रीराम जाधव, बबन वाघमारे यांनी प्रा.प्रदिप रोडे यांचा तर डॉ.ज्योती वंजारे ,आयु.मगंल मस्लेकर मॅडम,आयु.मगर मॅडम यांनी तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा दिपाताई रोडे यांचा यथोचित सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रा.प्रदिप रोडे हे दक्षिण कोरियाची राजधानी सेऊल येथे अभ्यास दौऱ्यासाठी गेले होते. यावेळी १५ मे रोजी कोरियन परंरेप्रमाणे बुद्ध जन्मदिनाचे औचित्य साधुन दक्षिण कोरिया येथील बुद्ध विहारामध्ये डॉ.बी.आर.आंबेडकर यांचा पहिला पुतळा अनावरण केला गेला. या पुतळा अनावरण सोहळ्यास भारतीय प्रतिनिधी मंडळात नालंदा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदिप रोडे आणि तुलसी महिला मंडळाच्या अध्यक्षा दिपाताई रोडे यांची उपस्थिती होती. या ऐतिहासिक घटनेचे




साक्षीदार म्हणून उपस्थित राहिल्याबद्दल शाक्यमुनी प्रतिष्ठान बीडच्या वतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सत्कार समारंभ कार्यक्रमात इंजि.भिमज्ञ वेडे, इंजि. वशिष्ठ तावरे, प्रा.नामदेव शिनगारे, प्रा.बी.वाय.जोगदंड, प्रा.लक्ष्मण गुंजाळ, प्रा.डॉ.अर्जुन राठोड, कवी अशोक मस्लेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करत दक्षिण कोरिया दौरा आणि वाढदिवसानिमित्त प्रा.प्रदिप रोडे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# शेवगाव : दादाजी वैशंपायन अध्यात्मिक व सामाजिक कार्यगौरव पुरस्कार जाही

शेवगाव (प्रतिनिधी)

गुरुदत्त सामाजिक प्रतिष्ठाणच्या वतीने देणात येणारा दादाजी वैशंपायन अध्यात्मिक व सामाजिक कार्यगौरव पुरस्कार जाहीर झाले असून यावर्षीचा अध्यात्मिक पुरस्कार पुणे येथील स्वामी समर्थ कृपांकित नारायण भाटे यांना तर सामाजिक पुरस्कार लातूर येथील निश्चल पुरी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.धर्मवीर भारती व अहमदनगर ( मढी ) येथील नाथ संप्रदाय अभ्यासक मिलिंद चवंडके यांना जाहीर झाला आहे.अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके व सचिव फुलचंद रोकडे यांनी दिली.



गुरुदत्त सामाजिक संस्थेच्या वतीने सन २०१० पासून दरवर्षी अध्यात्मिक क्षेत्रात व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या व्यक्तिंना अध्यात्मिक व सामाजिक पुरस्कार देवून गौरवण्यात येते.११ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप असून गुरुवार दि.२३ मे रोजी दुपारी ३.३० वाजता शेवगाव येथील प.पू.दादाजी वैशंपायन दत्त देवस्थान येथे नाशिक येथील प.पू.गजानन कस्तुरे, मुंबई येथील वित्त विभाग एमएसडीलचे संचालक अनुदिप दिघे आदींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी आमदार मोनिका राजळे, माजी आमदार चंद्रशेखर घुले, मुंबई येथील रिलायन्सचे सिनिअर एक्जुटिव्ह व्हा.प्रेंसिडेट गणेश राममूर्ती, तहसिलदार प्रशांत सांगडे, शरदकाका वैशंपायन, प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल,उदय देशपांडे,रवींद्र पुसाळकर, प्रशांत दिघे ,सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता प्रल्हाद पाठक आदी प्रमुख उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमासाठी अध्यात्मिक,धार्मिक क्षेत्रातील नागरीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष फडके व सचिव रोकडे यांनी केले आहे.

# शेत नावावर करण्यासाठी दारूड्या पोराची वडिलांना मारहाण; वडिलांनी डोक्यात फळी घालताच पोरगा ठार!

**शेवगाव (प्रतिनिधी)**

**दारूडा मुलगा शेती नावावर करून देण्यासाठी वडिलांना लाथाबुक्क्याने बेदम मारहाण करत असताना, वडिलांनी शेजारी पडलेली लाकडी फळी उचलून त्याच्या डोक्यात घातली. हा घाव वर्मी लागल्याने या दारूड्या मुलाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना नेवासा तालुक्यातील गोधेगाव येथे घडली. शिवाजी दादासाहेब जाधव, असे मृत मुलाचे नाव असून, दादा सारंगधर जाधव असे आरोपी वडिलांचे नाव आहे. अलकाबाई दादासाहेब जाधव या मुलाच्या आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून, आरोपीस अटक केली आहे.**

## नेवासा तालुक्यातील गोधेगाव येथील घटना; आईच्या तक्रारीवरून वडिलांविरोधात गुन्हा दाखल

सविस्तर असे, की नेवासा तालुक्यातील गोधेगाव येथील शिवाजी जाधव व वडील दादासाहेब जाधव यांच्यामध्ये शेतीवाटपाच्या कारणावरून मंगळवारी जोरदार भांडण झाले. यात शिवाजीने वडील दादा सारंगधर जाधव यांना लाथाबुक्क्यांनी जोरदार मारहाण करण्यास सुरूवात केली. त्यामुळे मुलगा शिवाजीच्या डोक्यावर दादा जाधव यांनी फळी मारली असता, तो जागीच कोसळला. दि.१४ मेरोजी ५ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. शिवाजी दादासाहेब जाधव याचा खून झाल्यानंतर मयताची आई अलका दादासाहेब जाधव हिच्या फिर्यादीवरून नेवासा पोलिसांनी भादंवि कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीस ताब्यात घेतलेले आहे. पोलीस निरीक्षक धनंजय जाधव हे तपास करीत आहेत.

अलका जाधव यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले की, दि.१४ मेरोजी दु. ०५/३० वा. चे सुमारास गोधेगाव ता. नेवासा येथील माझे रहाते घराचे समोरील पत्र्याचे शेडमध्ये मुलगा शिवाजी दादा जाधव वय ३६ वर्षे हा दारु पिवून येऊन आम्हांला वाईट शिवीगाळ करुन माझे पती यांना तुमच्या नावावर राहिलेली एक एकर शेतजमीन माझे नावावर करुन द्या. तुम्ही येथे राहू नका. तुमचे जनावरे येथे बांधू नका, नाहीतर तुम्हाला जीवे ठार मारुन टाकीन, अशी धमकी देवून पती दादासाहेब यांना लाथाबुक्क्यांनी व लाकडी काठीने मारहाण करु लागला असता, पती दादासाहेब यांनी त्यास प्रतिकार करत, पत्र्याचे शेडजवळ पडलेली लाकडी फळी त्याच्या डोक्यात जोरात मारुन गंभीर दुखापत केल्याने तो मयत झाल्याचे फिर्यादीतम्हटले आहे. पुढील तपास नेवासा पोलिस करत आहेत.

# शिष्यवृत्ती परीक्षेत राजवर्धन उगले उत्तीर्ण

शिरूर कासार (प्रतिनिधी)

शिरूर कासार येथील किराणा दुकानदार बाळासाहेब उगले यांचा मुलगा राजवर्धन बाळू उगले इयत्ता ५ वीसाठी महाराट्र राज्य परीक्षा परीषद पुणे पूर्वउच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी परीक्षेत उतीर्ण झाला असुन त्याचे सर्वत्रस्वागत व अभीनंदन होत आहे

शिरूर कासार तालुक्यातील दहिवंडी येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील पाचवीचा विद्यार्थी तथा येथील किराणा दुकानदार बाळू उगले यांचा मुलगा हर्षवर्धन बाळू उगले हा इयत्ता पाचवी साठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा पुणे यांच्या वतीने तो परीक्षेस पात्र झाला असून त्याचे सर्वत्र अभिनंदन व स्वागत होत आहे त्याच्या या यशाबद्दल आई-वडील विद्यालयातील त्याचे शिक्षक वृंद व सहकारी या सर्वांचे श्रेय असल्याचे तो म्हणाला या त्याच्या यशासाठी व पुढील भविष्य साठी सर्वांनी त्याचे कौतुक करून त्यास शुभेच्छा दिल्या आहेत

## अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ तसेच नाथमुद्रा प्रतिष्ठान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने

# नाथ बांधवांतर्फे नाथ दीक्षा (कांनचीरा )कार्यक्रमाचे आयोजन

**बीड (प्रतिनिधी)**

**अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ तसेच नाथमुद्रा प्रतिष्ठान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने गुरु गोरक्षनाथ जयंती निमित्त बीड जिल्हा तसेच संपूर्ण मराठवाड्यातील नाथबांधवांचा नाथ दीक्षाचा कार्यक्रम आयोजित करण्यात**



**आला असून या कार्यक्रमासाठी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष जयाजी नाथ मुंबई तसेच बीड जिल्ह्यातील नामवंत कार्यकर्ते योगेश भैय्या क्षीरसागर तसेच राज्य सचिव प्रा प्रकाश आहेरकर, मराठवाडा अध्यक्ष सोमनाथ धायडे व कल्याण धायडे यांच्या उपस्थितीत होणार आहे** तरी या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील सर्व नाथ बांधवांनी गुरु गोरक्षनाथ यांच्या जयंती दिवशी दिनांक २३/ ५/ २०२४ शुक्रवार रोजी कपिल मुनी मंदिर चराटा रोड या ठिकाणी उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्हा अध्यक्ष भरत चव्हाण, सचिव हरिभाऊ भराडी कार्याध्यक्ष संजय सावंत सर यांनी केले आहे.

# माजलगाव महिला व बाल विकास कार्यालयामध्ये मागितली जाते लाच

## महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे यांच्याकडे :- कपिल आडागळे यांची तक्रार!

टाकरवन (प्रतिनिधी)

लहानपणीच आई-वडिलांचं छत्र हरवलेल्या अनाथ मुलांच्या संगोपनासाठी शासनाकडून आर्थिक मदत दिले जाते. बाल संगोपन योजनेचा लाभ घेण्यासाठी महिला व बाल विकास कार्यालय माजलगाव मधील अधिकारी लाच मागत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. सहा महिन्यापासून अर्ज करून ही अनाथ मुलांना न्याय मिळत नाही. या प्रकाराबाबत येथील

कामचुकार अधिकार्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी महिला व बालविकास आयुक्तालय पुणे यांच्याकडे कपिल आडागळे यांनी दिलेल्या निवेदनातून केली आहे .महाराष्ट्र शासनाच्या वतीने महिला बालविकास योजनेअंतर्गत अनाथ मुलांना बाल संगोपनासाठी आर्थिक मदत दिली जाते. ही योजना २००८ मध्ये लागू करण्यात आलेले आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी महिला व बाल विकास कार्यालय माजलगावअर्ज करण्यास गेलेल्या नागरिकांना तेथील अधिकारी पैशाची मागणी करत आहेत. पैसे दिले तरच योजनेचा लाभ मिळेल अथवा लाभ मिळणार नाही. अशी भाषा अधिकाऱ्याकडून वापरली जाते. जे नागरिक या योजनेसाठी तेथील अधिकाऱ्याला पैसे देतात. त्यांनाच या योजनेत सामील करून लाभ दिला जातो. जे नागरिक अधिकाऱ्यांना पैसे देण्यास नकार देतात त्यांचे प्रस्ताव सहा सहा महिने

महिला व बाल विकास कार्यालया मध्ये धुळखात पडलेले आहेत. तालुक्यातील अनाथ मुलावर अन्याय होत आहे.या योजनेतून अनाथ मुलांना लाभ मिळण्या ऐवजी लाच मागितली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. माजलगाव महिला व बाल विकास कार्यालय मधील लाच मागणाऱ्या अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्री.कपिल आडागळे यांनी. महिला व बाल विकास आयुक्तालय पुणे , मा. श्री.मोरे साहेब यांच्याकडे यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

# अशुद्ध पाणीपुरवठ्यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात; गावपुढारी बेफिकीर

## जबाबदार सरपंच ,ग्रामसेवकांवर कारवाई करा :- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतची असुन पिण्याच्या पाण्याचे दररोज शुद्धीकरण करणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत हद्दीत असणारे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत परीसर यांची नियमित साफसफाई करणे आवश्यक आहे. सध्या अवकाळी पाऊस व पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणी दुषित होण्याची शक्यता आहे. पाणी गुणवत्ता व नियंत्रणाच्या कामात कोणताही हलगर्जीपणा न करता ग्रामस्थांना शुद्ध व सुरक्षित पाण्याचा पुरवठा करण्याचे पावसाळ्यात उत्तम दर्जाचे टी.सी.एल. प्रत्येक ग्रामपंचायतीत पुरेसा प्रमाणात उपलब्ध राहील याची दक्षता घेणे गरजेचे आहे. आणि जलजन्य आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याचे जिल्हा प्रशासनाने दिलेले निर्देश गावपुढारी फाट्यावर मारताना दिसत असुन अशुद्ध पाणीपुरवठा होऊन गावांमध्ये जलजन्य आजारांची साथ पसरल्यास सरपंच आणि ग्रामसेवकांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर, शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) जिल्हा परिषद बीड डॉ.ज्ञानोबा मोकाटे यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

अशुद्ध पाण्यामुळे जलजन्य आजारांची साथ पसरण्याची भिती ; उपाययोजना आवश्यक

कडक उन्हाळा सुरू असुन पाण्याची पातळी झपाट्याने खालावली आहे.पाण्यासाठी वणवण सुरू असुन वातावरण बदलामुळे आणि अशुद्ध पाणी पिल्याने कॉलरा ,अतिसार ,गॅस्ट्रो, कावीळ ,विषमज्वर आदि जलजन्य आजारांची साथ पसरण्याची दाट शक्यता आहे. त्यासाठी नळ योजनेंतर्गत पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या पाईपलाईनची तपासणी वेळोवेळी करून



गळती होत असल्यास थांबवावी, खड्डे असल्यास वेळोवेळी बुजविण्यात यावेत. गटारी,नाल्यातील सांडपाणी वाहण्याची ठिकाणे स्वच्छ करण्याची तसेच विहिर व हातपंपाच्या सभोवताली पाणी साचुन राहणार नाही तसेच विहिर,हातपंपाचे ओटे फुटलेले असल्यास त्याची त्वरित दुरुस्ती करणे गरजेचे आहे.त्याचबरोबर आठवड्यातून एकदिवस कोरडा दिवस पाळावा, पाणी उकळून थंड करून प्यावे, विहीर आणि टाकीतील पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्याची आवश्यकता आहे.

जलजीवन योजना गावपुढारी आणि आधिका-यांसाठी भ्रष्टाचाराचे कुरण

बीड जिल्ह्यात कोट्यवधी रूपयांची केंद्र शासनाची जलजीवन योजना राबविण्यात आली.बहुतांश गावातील ग्रामस्थांनी या योजनेच्या बोगस कामाबाबत तक्रारी केल्या आणि चौकशी मध्ये बोगसपणा निष्पन्न सुद्धा झाला.अनेक गावातील गावपुढा-यांनी आधिका-यांशी संगनमत करून कागदावर योजना पूर्ण झाल्याचे दाखवुन निधीचा अपहार केला आणि ग्रामीण भागातील वाड्या वस्तीवरील ग्रामस्थांसाठी जीवदान ठरणारी जलजीवन योजना गावपुढारी आणि आधिका-यांसाठी भष्टाचाराचे कुरण ठरली. ग्रामस्थांनी पाण्यासाठी भटकंती सुरूच आहे. जारचे पाण्याने तहान भागवली जाते

ग्रामीण भागात शासनाच्या विविध नावे बदलुन पाणीपुरवठा योजना राबविण्यात येतात.एकाच गावात ३-३ पाणीपुरवठा राबवुनही गावे तहानलेलीच आहेत. ग्रामस्थांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे यासाठी जल शुद्धीकरण केंद्रावर मोठ्या प्रमाणात निधी खर्च करण्यात आला मात्र बहुतांश गावातील जलशुद्धीकरण केंद्र धुळखात पडुन आहेत. व्यावसायिक आणि ग्रामस्थांना विकत जारचे पाणी घेऊन तहान भागवावी लागते त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन प्रशासन मात्र जाणिवपूर्वक डोळेझाक करत असल्याचे दिसून येत आहे.केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशन अभियान अंतर्गत पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शौचालयाची कामे करण्यात आली आहेत.हगणदारीमुक्त गाव करण्यासाठी जनजागृती करून शौचालय बांधकामासाठी १२ हजार रूपयांचे अनुदान देण्यात आलेले आहे.बहुतांश गावांनी शंभर टक्के नागरीकांनी शौचालयाची कामे पूर्ण केल्याचा प्रशासनाचा दावा करत गावे पाणंद मुक्त झाल्याचा गवगवा करण्यात आला आहे.मात्र आता तिव्र पाणीटंचाई मुळे पाण्याअभावी शौचालयाचा वापर बंद असल्याने ग्रामस्थांनी पुन्हा लोटा घेऊन पांदीचा आधार घेतल्याचे दिसून येते त्यामुळे पाणीटंचाई मुळे हागणदारी मुक्तीला खिळ बसल्याचे दिसून येत आहे.

# नफरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा पासून २ किलोमीटर अंतरावर असणाऱ्या नफरवाडी येथे ह भ प वैकुंठवासी ज्ञानोबा माऊली बिनवडे यांच्या हस्ते सुरू झालेला आणि वारकरी संप्रदायाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह भ प प्रकाश महाराज बोधले यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १७ /५/ २०२४ ते दिनांक २४ /५/ २०२४ नफरवाडी येथे ज्ञानेश्वरी पारायण अखंड हरिनाम सप्ताह साजरा होत आहे ज्ञानेश्वर पारायण यांचे नेतृत्व ह भ प दत्ता महाराज येवले गाथा भजन समस्त भजनी मंडळ नफरवाडी या सप्ताहात नामांकित कीर्तनकाराचे कीर्तने असून दि. १७/ ५ /२०२४ ह भ प दत्ता महाराज येवले दिनांक १८/ ५/ २०२४ राधेश्याम महाराज वाकळे श्री धर्मवीर शंभूराजे वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची दिनांक १९ /५ /२०२४ ह भ प शिवाजी महाराज येवले हनुमान टेकडी दिनांक १९/ ५/ २०२४ ह भ प रामकृष्ण रंधवे बापू विठ्ठल गड दिनांक २१/ ५/ २०२४ ह भ प सतीश महाराज उरणकर विठ्ठल रुक्मिणी संस्थान पाटोदा दिनांक २२/५/२०२४ ह भ प दयानंद महाराज कोरेगाव ता. कर्जत दिनांक २३ ५ २०२४ ह भ प प्रकाश बोधले महाराज आणि काल्याचेही कीर्तनही ह भ प प्रकाश बोधले



महाराज यांचे होणार आहे या सप्ताहात नामांकित गायनाचार्य मृदंगाचार्य यांची उपस्थिती प्रार्थनीय राहणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा अवश्य लाभ घ्यावा असे गावकऱ्यांनी कळवले आहे.



शिवसंग्राम बीड शहर अध्यक्षपदी सुहास पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना बीड जिल्हा मजूर सहकारी संघाचे संचालक मा माधवराव सोनवणे, राजाभाऊ तौर, जगदीश बादाडे, रामदास नाईकवाडे व ईतर

# मोदींना पुन्हा पंतप्रधान करा, पुढच्या ६ महिन्यात पीओके भारतात असेल-योगी

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी शनिवारी महाराष्ट्रात सभा घेतली. यावेळी पालघरमधील सभेला संबोधित करताना त्यांनी पीओकेबाबत मोठा दावा केलाय. सीएम योगी आदित्यनाथ म्हणाले की, 'जो आम्हाला मारतो त्याची आम्ही पूजा करणार नाही. जर कोणी आमच्या लोकांना मारले तर आम्ही देखील तेच करू जे त्याच्या लायकीचे आहे. आता हेच होत आहे. आता पाकव्याप्त काश्मीर वाचवणेही पाकिस्तानला कठीण जात आहे. तुम्ही नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करुन दाखवा. पुढील ६ महिन्यात पीओके भारताचा होईल हे तुम्हाला दिसेल. यासाठी हिंमत लागते. ताकद असेल तरच हे काम करता येईल.

**हा नवा भारत आहे- योगी**

योगी आदित्यनाथ म्हणाले की, 'आम्ही काँग्रेस आणि इंडिया आघाडी सारखे नाही. हे लोक म्हणायचे की पाकिस्तानातून दहशतवादी येत आहे मग आम्ही काय करू. आज पाकिस्तानने आपल्याकडे वाकड्या नजरेने पाहिले तरी डोळे काढले जातात. न घाबरता, न थांबता आणि खचून न जाता विकासाच्या प्रवासात वाटचाल करणारा हा नवा भारत आहे. याचे नेतृत्व खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. या प्रकारचा नवा भारत तुम्हा सर्वांसमोर आहे.

**योगींनी दिला ४०० पारचा नारा**

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे बुलडोझर पोस्टर लावून अनेक ठिकाणी स्वागत करण्यात आले. कुर्ल्यातील सभेला संबोधित करताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, मोदी सरकारचे नारे पुन्हा एकदा देशभर गुंजत आहेत. यावेळी ४०० च्या वर गेल्याने काँग्रेस आणि विरोधक त्रस्त आहेत. योगी आदित्यनाथ यांनी मुंब्रा देवीसह सिद्धिविनायकाचे ही दर्शन घेतले. योगी आदित्यनाथ यांनी भारत माता की जय आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा दिल्या. मुंबई उत्तर मध्य मतदारसंघात भाजपचे उमेदवार उज्ज्वल निकम .



### काँग्रेसवर टीका

वारसा कर लागू करण्याच्या कथित प्रस्तावावर मुख्यमंत्री योगी यांनी काँग्रेसवरही टीका केली. ते म्हणाले की, मुघल सम्राट औरंगजेबच्या आत्म्याने विरोधी पक्षात प्रवेश केला आहे. वारसा कर हा औरंगजेबाने लावलेल्या जिझिया करासारखा आहे, असेही योगी म्हणाले. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव शहरात एका सभेला संबोधित करताना आदित्यनाथ म्हणाले की, भाजप केवळ सत्तेसाठी नाही तर विकसित भारत घडवण्यासाठी निवडणूक लढवत आहे. नरेंद्र मोदी पुन्हा एकदा पंतप्रधान होणार आहेत यात शंका नसावी.

# परभणी-परळी दुहेरी रेल्वेमार्गाला गती

## भूमी अधिग्रहण करण्याची अधिसूचना जारी

परळी / अनुप कुसुमकर

केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पात सन २०१०-११ मध्ये मंजुरी मिळालेल्या परभणी-परळी दुहेरीकरण रेल्वे मार्ग कामाला खऱ्या अर्थाने गती मिळाली असून या दुहेरीकरण मार्गासाठी जमीन आधिग्रहन करण्याची अधिसूचना रेल्वे मंत्रालयाने काढली आहे. या दुहेरीकरण मार्गासाठी एकूण ७७० करोड रुपये निधी मंजूर झाला असल्याने आगामी काळात या मार्गाचे दुहेरीकरण लवकर पूर्ण होणार आहे.




दक्षिण मध्य रेल्वे विभागातील विविध मार्गावर दुहेरीकरण आणि विद्युतीकरणाची कामे जलदगतीने पूर्ण केली जात आहेत.परभणी जंक्शन येथून पूर्णा, जालना सोबतच परळीकडे जाणारा मार्ग आहे. परभणी-परळी या रेल्वे मार्गाचे एकूण अंतर ६४.७१ किलोमीटर एवढे आहे. परभणी-परळी या मार्गावर दररोज १५ ते २० रेल्वे गाड्या धावतात. या सोबतच परळी येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रासाठी लागणाऱ्या कच्च्या कोळशाची मालगाडीद्वारे वाहतूक करण्यात येते.या मार्गावरील रेल्वेगाड्याची वर्दळ जास्त असल्याने अनेक वेळा परळी स्थानकापासून जवळच असलेल्या वडगाव निळा या ठिकाणी क्रॉसिंगमुळे तासनतास उभ्या असतात यामुळे या मार्गावर दुहेरीकरण करण्याची मागणी प्रवाशीवर्गातून वारंवार करण्यात आली होती.

सन २०१०-११ च्या केंद्रीय रेल्वे अर्थसंकल्पामध्ये परभणी-परळी रेल्वे मार्गाचा समावेश दुहेरीकरण कामासाठी केला होता. त्यानंतर प्रत्यक्षात कामासाठी निधी मिळाला नसल्याने हे काम अपूर्णच राहिले. सदरील काम पूर्ण करण्यासाठी लागणारा आवश्यक निधी ७७० कोटी रुपये मंजूर झाल्याने या मार्गाचे दुहेरीकरण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाच्या दक्षिण मध्य रेल्वे विभागाकडून १५ एप्रिल २०२४ रोजी भूमी अधिग्रहण करण्याची अधिसूचना काढली आहे.या मार्गावरील जमिनीचे अधिग्रहण होऊन प्रत्यक्षात लवकरच कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

# लाचखोर पीआय हरीच्या घरात १.८५ कोटींची बेसुमार लंका

## ९७० ग्रॅम सोने, ५.५ किलो चांदी, बारामती, परळी, इंदापूरमध्ये मालमत्ता

बीड ।प्रतिनिधी

एक कोटीच्या लाच प्रकरणातील ५ लाख रुपयांचा हप्ता सहायकामार्फत घेतल्याचा गुन्हा दाखल झालेले बीडच्या आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हरिभाऊ खाडे यांच्या चाणक्यपुरीतील घराची एसीबीच्या पथकाने गुरुवारी हरिभाऊ खाडे परवानगीने झडती घेतली. या घरातून १ कोटी ८ लाखांची रोकड, ७२ लाख रुपयांचे ९७० ग्रॅम सोने, ४ लाख ६२ हजार रुपये किमतीची साडेपाच किलो चांदी असा एकूण १ कोटी ८५ लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला.





# पंकजाताई मुंडे यांचा नाशिक मतदारसंघात झंझावात डॉ. भारती पवार यांच्या प्रचारार्थ सोनगावात जोरदार सभा

**दिंडोरी । नरेंद्र मोदींशिवाय देशाला पर्याय नाही. गेल्या दहा वर्षांत देशाची त्यांच्या नेतृत्वाखाली विकासाकडे वाटचाल सुरू आहे. मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी डॉ. भारती पवार यांना जास्तीत जास्त मताधिक्याने संसदेत पाठवा असं आवाहन भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज जाहीर सभेत केले.**

**दिंडोरी लोकसभा मतदारसंघाच्या भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.भारती प्रविण पवार यांच्या प्रचारार्थ आज श्रीरंग लॉन्स सोनगांव सायखेडा येथे आयोजित केलेल्या जाहिर सभेत त्या बोलत होत्या.**

लोकनेते मुंडे साहेबांच्या विचाराचा वसा आणि वारसा मी पुढे घेऊन जात आहे, याबाबत कुणाचं दुमत असण्याचे कारण नाही कारण ते माझे केवळ माझे पिता नव्हते तर ते माझे नेते होते, त्यांनी जे संस्कार आम्हाला दिले आहेत त्यानुसार माझी वाटचाल सुरू आहे. आज भारतीताईंच्या मागे एक महिला म्हणून मी खंबीरपणे उभी आहे.

नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपला देश आज विकासाच्या वाटेवर आहे. त्यांना पुन्हा पंतप्रधानपदी विराजमान करून राष्ट्रहित साधून भारताचा झेंडा विश्वस्तरावर अविरतपणे फडकविण्यासाठी डॉ.भारती पवार यांना जास्तीत जास्त मताधिक्य देऊन दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून देशाच्या संसदेत पाठवावे असं आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

या सभेस उमेदवार डॉ.भारती पवार, निफाडचे आ.दिलीप बनकर यांच्यासह भारतीय जनता पक्ष आणि महायुतीचे सर्व नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नित्रुड जवळ तिहेरी अपघातात

# एक ठार तर तीन जखमी

माजलगाव (प्रतिनिधी)

तेलगाव कडून माजलगावकडे पाठिमागुन येणाऱ्या दुचाकी व बैलगाडीला चार चाकी वाहनाने धडक दिली. यामध्ये दुचाकी वरील एकाचा जागीच मृत्यू झाला.ही घटना तालुक्यातील नित्रुड जवळ घडली. यामध्ये एका बाळासह तिघेजण जखमी झाले आहेत.




खामगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावर संध्याकाळी सहा वाजता सुमारास तेलगाव कडून माजलगाव कडे येणा-या दुचाकीला पाठीमागून आलेल्या चार चाकी वाहनाने पाठीमागून धडक दिली. ही धडक देत असताना या चार चाकी वाहनाने बाजूहुन जात असलेल्या बैलगाडीला देखील धडक दिली. यामध्ये मोटरसायकल चालक रतन कांबळे (४५) यांना डोक्याला मार लागल्याने हे जागीच ठार झाले तर त्यांच्यासोबत असलेल्या मनीषा सुरेश वाघमारे ( ४० ) ,लक्ष्मी लखन कदम (३०) व कार्तिक लखन कदम ( ३ ) हे गंभीर जखमी झाले.

यावेळी तेलगाव येथील ट्रॉमा केअरच्या रूग्णवाहिकेचे डॉ. एम.बी.गायकवाड ,सहाय्यक चालक शाम चव्हाण यांनी तत्परता दाखवत केवळ चार मिनिटात घटनास्थळी पोहोचले.व त्यांना तात्काळ माजलगाव येथील ग्रामीण रूग्णालयात उपचारासाठी घेऊन आले.येथील ग्रामीण रूग्णालयाचे डॉ. सुभाष बडे यांनी जखमेवर तात्काळ उपचार करून त्यांना बीड येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले. या वाहनाने बैलगाडीला धडक दिल्याने दोन्ही बैलाचे पाय मोडल्याची घटना घडली.

# हिंदूत्व सोडले आता भगव्या झेंड्याची ॲलर्जी कारण तुमच्या रॅलीत पाकिस्तानचे झेंडे

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उबाठावर जोरदार टिका
## यामिनी जाधव यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्र्यांची जाहीर सभा




मुंबई (प्रतिनिधी)

बाळासाहेबांचे विचार सोडून काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसलेल्यांनी हिंदूत्व सोडले. आता तर त्यांना शिवरायांचा भगवा झेंडा, प्रभू रामचंद्राचा भगवा आणि वारकऱ्यांच्या भगव्या झेंड्याची ॲलर्जी झालीय कारण तुमच्या प्रचार रॅलींमध्ये पाकिस्तानचे झेंडे फडकत आहेत, अशी जोरदार टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उबाठावर केली.

दक्षिण मुंबईतील महायुतीच्या उमेदवार यामिनी जाधव यांच्या प्रचार सभेत मुख्यमंत्री बोलत होते. राज्यभरात पहिल्या चार टप्प्यात महायुतीला भरभरुन प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे महायुतीचे जास्तीत जास्त खासदार निवडून येतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

आपले सरकार येण्यापूर्वी सगळी कामे बंद होती. मेट्रो कारशेड, अटल सेतू, समृद्धी महामार्ग, मुंबईचे सौंदर्यीकरण असे अनेक प्रकल्प महायुतीने सुरु केले. दोन अडीच वर्षात मुंबईतील रस्त्यांवर एकही खड्डा दिसणार नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले. यापूर्वी रस्त्यावर केवळ डांबर टाकायचे आणि त्यात पैसे खायचे. यासाठी महापालिकेचे दहा वर्षात साडेतीन हजार कोटी रुपये खर्च झाले होते. पुढील २५ - ३० वर्षात रस्त्यावर एकही खड्डा दिसणार नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले.

रखडलेले प्रकल्प, कोणामुळे अडकलेले प्रकल्प मार्गी लावून मुंबईबाहेर फेकलेल्या मुंबईकरांना हे सरकार परत आणणार आहे. त्यासाठी बीडीडी प्रकल्प, पोलिसांची घरे म्हाडा, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, एमआयडीसीच्या माध्यमातून पुनर्विकासाचे प्रकल्प सुरु करणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. मुंबईसाठी इतके वर्ष काय केले, याचा हिशेब मुंबईकर येत्या निवडणुकीत विचारल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली. ज्या उपक्रमातून मुंबईकरांना लाभ होत असेल

### सर्वांना समान वागणूक

ही निवडणूक देश घडवणारी निवडणूक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मागील १० वर्षात देशाला जगभरात मानसन्मान मिळवून दिला. नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करायचे आहे. यासाठी यामिनी जाधव यांना निवडून द्यायचे आहे. आपल्या सरकारमध्ये भेदभाव नाही. हिंदू असो वा देशभक्त मुसलमान सर्वांना समान वागणूक दिली जाते. मात्र उबाठाच्या मिरवणुकीत पाकिस्तानचे झेंडे फडकतात. त्यांच्या रॅलीमध्ये मुंबई बॉम्बस्फोटीतील आरोपी इक्बाल मुसा फिरतो. याकूब मेनन यांच्या कबरीचे उदात्तीकरण होतेय. मुंबई हल्ल्यातील शहिद पोलीसांचा अपमान केला, अशा ढोंगी लोकांना निवडणुकीत जागा दाखवा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT